संकट आणि तथ्य

मी आजकाल बऱ्याच ठिकाणी पाहतोय, एखाद्या कंपनीवर आर्थिक अडचणी आल्या की ते काही प्रामाणिक आणि व्यवस्थित काम करणाऱ्या लोकांना देखील कामावरून पायउतार व्हायला सांगतात, ज्याच्यावर/ जिच्यावर ती वेळ आली आहे, त्याची/ तिची मनःस्थिती एकदम अस्थिर होते, अनेक समस्या, पैशांची अडचण, आव्हाने समोर येऊ लागतात, तब्येतीवर परिणाम होऊ शकतो, कुणाला कसे सांगावे, लोकांना कळले तर काय होईल आणि कैक विचार.

पण लक्षात घ्या एखादा श्रीमंत माणूस आहे, तो आर्थिक अडचणीत आला तर काय करेल, स्वतःकडचे हिरे, सोने, दाग दागिने विकेल आणि अडचण दूर करेल, बरोबर ?, तो उगाच स्टील-पितळेची भांडी, कपडे, जून्या वस्तू ,भंगार वगैरे विकून पैशाची तजवीज करत बसेल का ?

या प्रश्नातच सर्व मतितार्थ आला...

थोडक्यात तुमच्या आयुष्यात जर अशी वेळ समोर आली तर लक्षात घ्या; तुम्ही अस्सल हिरा आहात, तुमची तिथे नसली, तरी बाजारात किंमत जास्त आहे, घाबरू नका, थोडा धीर धरा, मौल्यवान वस्तू आज नाही तर उशीरा का होईना ती मजबूत किमतीलाच विकली जाते, एखाद्याची ती वागवायची ताकद संपली म्हणून त्याने बाहेर काढली असे समजायचे, मूल्य जाणणारा पारखी आज ना उद्या भेटतोच.

हा एक साधा विचारच त्या नोकरीतून बाहेर काढलेल्या व्यक्तीला नवीन उभारी, नवं चैतन्य नक्कीच देऊन जाईल, असा विश्वास मला मनापासून वाटतो.

© सपु
www.saarthbodh.com